# कार्यालय,
# महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

**UGC-NET/MH-SET/CSIR-NET-2022 या परीक्षांच्या ऑफलाईन प्रशिक्षण योजनेचा तपशिल**

**योजनेचे नाव:-**
UGC-NET/MH-SET/CSIR-NET-2022 या परीक्षांसाठी ऑफलाईन प्रशिक्षण योजना

1. **योजनेचा उद्देश व स्वरुप** :-

महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर मध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाअंतर्गत OBC/SBC/VJNT या गटातील 2000 पात्र उमेदवारांना सन 2022-23 या आर्थिक वर्षात ऑफलाईन पध्दतीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

2. प्रशिक्षणासाठी सामाजिक वर्गवारीनुसार उपलब्ध जागा पुढीलप्रमाण असतील:-

| प्रवर्ग | जागा |
|---|---|
| OBC | 1180 |
| VJNT | 700 |
| SBC | 120 |
| एकुण जागा | 2000 |

टिप:- प्रत्येक प्रवर्गातील जागांमध्ये 30% जागा महिलांसाठी व 3% जागा दिव्यांग उमेदवारांना समावेश करण्यात येईल.

3. **उमेदवारांना सर्व साधारण पात्रता** :-

1. उमेदवारांना महाराष्ट्र राज्यातील रहिवासी / अधिवासी असला पाहिजे.
2. उमेदवार हा OBC/SBC/VJNT या गटातील असणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराकडे जातीचा दाखला व नॉन क्रिमीलेअर असणे बंधनकारक आहे.
4. युजीसी कडून मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी परीक्षा (अंतीम) मध्ये किमान 50% सरासरी गुण असणे आवश्यक आहे.
5. उमेदवाराचे अधिकतम वय 36 वर्षे असावे.
6. दिव्यांग उमेदवारांकडे 40% पेक्षा अधिक प्रमाण असलेल्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.

टिप:- प्रशिक्षणासाठी निवड करण्यासाठी उमेदवाराने अरेरावी, राजकीय व नोकरशाही दबावतंत्राचा वापर केल्यास त्याची उमेदवारी रद्द होईल.
टिप:- विद्यार्थ्यांने खोटे कागदपत्रे सादर करुन योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास असल्यास त्यांचेकडुन संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करुन त्याचेवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

4. **उमेदवार निवड प्रक्रिया** :-

उमेदवारांची निवड पदव्युत्तर पदवी परीक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे किंवा छाननी परीक्षेद्वारे सामाजिक प्रवर्गनिहाय निवड यादी (मेरीट) नुसार करण्यात येईल.

जर निवड करताना काही उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले असल्यास, त्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे त्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

5. **प्रशिक्षण स्थळ :- पुणे**

6. **प्रशिक्षणाचा कालावधी :- सहा महिने (अंदाजे)**

7. विद्यावेतन, प्रत्यक्ष प्रशिक्षणास रुजु झाल्याच्या दिनांकापासुन किमान 75% मासिक उपस्थिती या अटीवर निश्चित दराने मासिक विद्यावेतन देण्यात येईल. ज्या उमेदवारांची मासिक उपस्थिती 75% पेक्षा कमी राहिल त्यांना त्या महिण्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही.

8. **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे पुढीलप्रमाणे:-**

1) विहित नमुनामध्ये संपूर्ण भरलेला अर्ज, त्यावर अलीकडच्या कालावधीत रंगीत फोटो असावा.
2) मुळ पदवी गुण पत्र व प्रमाणपत्र (स्कॅन प्रत)
3) जातीचा दाखला / प्रमाणपत्र (स्कॅन प्रत)
4) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (स्कॅन प्रत)
5) मुळ पदव्युत्तर पदवी गुण पत्र व पदवी प्रमाणपत्र (स्कॅन प्रत)
6) मुळ अधिवासी प्रमाणपत्र (स्कॅन प्रत)
7) मुळ आधारकार्ड (स्कॅन प्रत)
8) अपंगत्वाचा सक्षम प्राधिकरणाचा दाखला (स्कॅन प्रत)

**टिप:- मुळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी तयार ठेवावेत, त्यासाठी स्वतंत्रपणे वेळ कळविण्यात येईल.**

9. **ऑनलाईन अर्ज करावयाचा कालावधी** :- दि.10/10/2022

वर नमुद प्रशिक्षणासाठी https://mahajyoti.org.in या संकेतस्थाळावर उपलब्ध करुन दिलेल्या " नोटीस बोर्ड " वरील उपलब्ध गुगल फार्म मध्ये दि.10/10/2022 पर्यंत अर्ज करावे. उमेदवारांने इतर कोणत्याही ई-मेल आय.डी वर अर्ज पाठवुन नयेत अशा अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी व अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास उचित बदल करुन त्यास मान्यता देण्याचे अंतिम अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना असतील.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर